शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

प्रशिक्षणात प्राविण्यम

सत्यमेव जयते

बी.एड. द्वितीय वर्ष

शैक्षणिक वर्ष :- २०२६-२७

नशामुक्त युवा- विकसित भारत २०४७

अहवाल

दिनांक:-१४/०८/२०२६ **वार:-शुक्रवार**

दिनांक १४/०८/२०२६ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे 'नशामुक्त युवा - विकसित भारत २०४७' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्रा.डॉ. रमा भोसले मॅडम उपस्थित होत्या. तसेच या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे ब्रह्मकुमारी संस्थेचे मा.डॉ.बी.के.अंजली मॅडम, मा.बी.के.पल्लवी बेन मॅडम, मा.बी.के.पंकज सर उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापिकावृंद आणि छात्राध्यापकांच्या उपस्थित हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा, प्रमुख अतिथीगण आणि सर्व प्राध्यापिकावृंदांनी दीपप्रज्वलन आणि सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर मा.प्रा.प्रियांका सुभेदार मॅडम यांनी सर्व प्रमुख

पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि कार्यक्रमाची प्रास्ताविका सादर केली. यानंतर कार्यक्रमाला आलेल्या सर्व अतिथींचे तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षांचे आणि सर्व प्राध्यापिकावृंदांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर ‘नशा मुक्त युवा- विकसित भारत २०४७’ याची सर्वांनी प्रतिज्ञा घेतली. पुढे मा.डॉ.बी.के.अंजली मॅडम यांनी नशा मुक्त युवा विकसित भारत २०४७ या विषयावर मोलाचे मार्गदर्शन दिले. तसेच मा.बी.के.पल्लवी बेन मॅडम यांनी सुद्धा मोलाचे मार्गदर्शन दिले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्षा मा.प्रा.डॉ.रमा भोसले मॅडम यांनी ‘नशामुक्त युवा- विकसित भारत २०४७’ या विषयावरती सखोल मार्गदर्शन केले. ‘नशामुक्त युवा-विकसित भारत २०४७’ हा उपक्रम यशस्वीपणे राबविल्यामुळे ब्रह्मकुमारी संस्थेच्यावतीने शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेलला स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. शेवटी छात्राध्यापिका प्रतिभा चाबके मॅडम

यांनी कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण करून कार्यक्रमाची सांगता केली. अशाप्रकारे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडण्यात आला.

दीपप्रज्वलन आणि सरस्वती मातेचे प्रतिमेचे पूजन करताना कार्यक्रमाच्या अध्यक्षा, प्रमुख पाहुणे आणि सर्व प्राध्यापिकावृंद

प्रमुख पाहुण्यांचा परिचय आणि कार्यक्रमाची प्रास्ताविका सादर करताना मा.प्रा.डॉ.प्रियांका सुभेदार मॅडम

मा.डॉ.बी.के अंजली मॅडम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना मा. प्रा.डॉ.रमा भोसले मॅडम

मा.प्रा.डॉ.रमा भोसले मॅडम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना मा.प्रा.डॉ.प्रियांका सुभेदार मॅडम

नशामुक्त युवा-विकसित भारत २०४७ या विषयावर मोलाचे मार्गदर्शन करताना मा.डॉ.बी.के अंजली मॅडम

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा.प्रा.डॉ.रमा भोसले मॅडम

ब्रहमकुमारी संस्थेच्या वतीने महाविद्यालयाला स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण करताना छात्राध्यापिका प्रतिभा चाबके मॅडम

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना छात्राध्यापक विशाल गावित

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

(बी. एड. २०२५-२७)

"विकसित भारत २०४७ - नशामुक्त युवा"

निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात आनंद होत आहे की दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल आणि ब्रह्मकुमारी पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने "नशामुक्त युवा" हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी यासाठी विकसित भारत-२०४७ साठी नशामुक्त युवा या अंतर्गत छात्रअध्यापकांनी शपथ घ्यायचे आहे. त्यासाठी सेमिनार कक्षामध्ये उपस्थित राहून शपथ घ्यायचे आहे.

• आयोजक •
मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार

• अध्यक्ष •
मा. प्राचार्य. डॉ. रमा भोसले

• प्रमुख अतिथी •
डॉ. अनघा सुंकले
बी. के. पल्लवी बेन

• प्रमुख उपस्थिती •
मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे
मा. प्रा. डॉ. उज्ज्वला डोणे

स्थळ - सेमिनार कक्ष
वेळ - सकाळी ११:१५

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

(बी.एड. २०२५-२७)

'विकसित भारत २०४७ - नशामुक्त युवा"

कार्यक्रम पत्रिका

सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन	मान्यवरांच्या हस्ते
प्रस्तावना व पाहुण्यांचे परिचय	मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार
प्रमुख पाहुण्यांचे स्वागत	मा. प्राचार्यांच्या हस्ते
मा. प्राचार्य व प्राध्यापकांचे स्वागत	प्राध्यापक वृंद/ प्रथम वर्ष छात्राध्यापक
नशामुक्त युवा शपथ	सर्व छात्र अध्यापक
प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन	डॉ. अनघा सुंकले बी.के. पल्लवी बेन
अध्यक्षीय मनोगत	मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले
आभार प्रकटीकरण	प्रतिभा चाबके
सूत्रसंचालन	विशाल गावित
व्हिडिओ, फोटोग्राफी	भावेश वळवी ,जयेश नडगे
निमंत्रण पत्रिका व कार्यक्रम पत्रिका	जयेश नडगे
फलकलेखन	नितीन कवाड

दिनांक :- १४ ऑगस्ट, २०२६

स्थळ- सेमिनार कक्ष
वेळ- सकाळी ११:१५ वाजता